माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/०००७७६**

**अपिलार्थी श्री. राजेश राजाराम तांबे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**

सहाय्यक निबंधक (पूर्व पश्चिम उपनगरे), सहकार विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१

**प्रथम अपिलीय अधिकारी**

सहाय्यक निबंधक (पूर्व पश्चिम उपनगरे), सहकार विभाग,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०५.०५.२०२६</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. २८.०४.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. २८.०४.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. २८.०४.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०७.०१.२०२५ | | १७.०२.२०२५ | |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०१.०४.२०२५ रोजीच्या अर्जांन्वये माहिती दिलेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलार्थी यांनी दि. ०७.०१.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"प्रगती मंडळ व इतर गृह.नि. संस्था यांचे गोळीबार, खार-सांताक्रुझ (पुर्व) येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील विकासक शिवालिक वेंचर्स यांच्यामार्फत ईमारत क्रमांक २९ मधील सदनिका हस्तांतरित करण्याकरिता आपल्या कार्यालयास सादर केलेल्या सदनिकाधारकांच्या नावांची यादी मिळण्याबाबत."*

जन माहिती अधिकारी यांनी उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. १७.०२.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. आयोगाच्या कार्यालयाने जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क केला असता जन माहिती अधिकारी यांनी सादर केले की, त्यांना सुनावणी नोटीस उशीरा प्राप्त झाल्याने ते सुनावणीस उपस्थित राहू शकले नाहीत. तसेच त्यांनी अनुपस्थितीबद्दल दिलगीरी व्यक्त करुन पुढील तारीख देण्याची विनंती केली.

..२/-

४. सदर प्रकरणी कोणतेही आदेश पारित करण्याअगोदर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

५. पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थींनी मागणी केलेल्या माहितीसह उपस्थित रहावे.

## आदेश

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १९.०५.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

**मुंबई**
**दिनांक : ०५.०५.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**